आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. २०४ लगत जोड

(आरोपीस जेल प्रशासनाने आज प्रत्यक्ष हजर केले नाही. सदर आरोपीची हजेरी ही व्ही.सी.द्वारे नोंदवण्यात आलेली आहे. सदर आरोपीचे वकील न्यायालयात हजर असुन आरोपी व्ही.सी.द्वारे सदर केसमधील न्यायालयीन कामकाजात हजर आहे.)

(सदर साक्षीदार हस्ताक्षर तज्ञ असुन ते पुणे जिल्हा व सत्र न्यायालय येथे व्हीसीद्वारे हजर असुन त्यांचा पुरावा व्हीसीद्वारे नोंदवण्यात येत आहे. सदर व्हीसी रुममध्ये सदर साक्षीदार व कॉर्डीनेटर हजर असुन सदर पुरावा हा गुगलमिट सॉफटवेअरद्वारे नोंदवण्यात येत आहे व सदर व्हीसी रुममध्ये साक्षीदार आणि कॉर्डीनेटर यांच्या व्यतिरीक्त कुणीही हजर नसल्याबाबत खात्री केली आहे. तसेच सदर व्हीडीओ व ऑडीओ क्वॉलीटी क्लीअर असुन कनेक्टीव्ही संदर्भात काहीही अडचण दिसुन येत नाही.)

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.२० प्रकाश पोपट पवार यांचा उर्वरीत सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.एस. पटेकर यांचेमार्फत</u>**–

मी केलेल्या तपासणीसंदर्भात माझा अहवाल दाखल केलेला आहे व तपासणीवेळी माझ्या निदर्शनास आले की Exh. Q1 वरील सही ही S1 to S12 आणि N1 to N6 यावरील सहयांशी जुळत आहे व त्या सहया गौतम जाधवच्या आहेत. Q1 वरील सहीशी S49 to S54, S91 to S96, S133 to S138, S175 to S180 वरील सहया जुळत नाही. Q2 to Q6 वरील सहयांची तपासणी केली असता तपासणीवेळी त्यावर individual identifiable characteristics मिळाले नसल्याने त्यासंदर्भात मला definite opinion देता आले नाही. Q2 वरील सहीशी मी S13 to S18, S55 to S60, S97 to S102, S139 to S144 आणि S181 to 186 कंपेअर केली असता त्याबद्दल individual identifiable characteristics मिळाले नसल्याने त्यासंदर्भात मला definite opinion देता आले नाही. Q3 वरील सहीशी मी S19 to S24, S61 to S66, S103 to S108, S145 to S150 आणि S187 to S192 कंपेअर केली असता त्याबद्दल individual identifiable characteristics मिळाले नसल्याने त्यासंदर्भात मला definite opinion देता आले नाही. Q4 वरील सहीशी मी S25 to S30, S67 to S72, S109 to S114, S151 to S156 आणि S193 to S198 कंपेअर केली असता त्याबद्दल individual identifiable characteristics मिळाले

08-12-25

नसल्याने त्यासंदर्भात मला definite opinion देता आले नाही. Q5 वरील सहीशी मी S31 to S36, S73 to S78, S115 to S120, S157 to S162 आणि S199 to S204 कंपेअर केली असता त्याबद्दल individual identifiable characteristics मिळाले नसल्याने त्यासंदर्भात मला definite opinion देता आले नाही. Q6 वरील सहीशी मी S37 to S42, S79 to S84, S121 to S126, S163 to S168 आणि S205 to S210 कंपेअर केली असता त्याबद्दल individual identifiable characteristics मिळाले नसल्याने त्यासंदर्भात मला definite opinion देता आले नाही. माझ्या अहवालात मी नोट नोंदवली असुन त्यामध्ये Exh. S43 to S48 आणि N7 to N12 वरील सहया प्रकाश बोरुडे यांच्या स्वतःच्या असल्यामुळे ते irrelevant असल्याने मी consider केले नाही. तसेच नोटमध्ये Exh.S85 to S90 आणि N13 to N18 वरील सहया हे विद्या बबन उघडे यांच्या स्वतःच्या असल्यामुळे ते irrelevant irrelevant असल्याने मी consider केले नाही. तसेच नोटमध्ये Exh.S127 to S132 आणि N19 to N24 वरील सहया हे संतोष विश्वास कांबळे यांच्या स्वतःच्या असल्यामुळे ते irrelevant असल्याने मी consider केले नाही. तसेच नोटमध्ये Exh. S169 to S174 आणि N25 to N30 वरील सहया हे भुषण माधव संखे यांच्या स्वतःच्या असल्यामुळे ते irrelevant असल्याने मी consider केले नाही.

मी सदर मताच्या अनुषंगाने माझा अहवाल तयार केला. तो अहवाल दि.१४.१२.२०२३ रोजीचा असुन तो अहवाल मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे व डिपार्टमेंटचा शिक्का असुन त्यातील मजकुर बरोबर आहे व त्यावर H.W.91/2023 हा नंबर आमच्या ऑफीसचा केस नंबर आहे. सदर अहवालास **नि.२०७** देण्यात येतो. मी सदरचा अहवाल सिलबंद पाकीटात टाकुन तो पत्राद्वारे पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना दि.१९.६.२०२४ रोजी पोकॉ. एच.जी. शिंदे यांच्यामार्फत पाठवला होता. आता मला ते पुर्वी सिलबंद असलेले पाकीट दाखवण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यावर आमचे कार्यालयाचा शिक्का आहे. त्यास **नि.२०८** देण्यात येतो.

08-12-25

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.पी. रोकडे यांच्यामार्फतः</u>**

ज्या १५/२० प्रकरणांमध्ये मी साक्ष दिली आहे त्यापैकी किती प्रकरणे फसवणुकीची व फोर्जरीची होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की

हस्ताक्षर आणि सहया तपासण्यासाठी वेगवेगळया पध्दती आहेत. मी सांगतो की एकच पध्दत आहे. हे म्हणणे खरे नाही की हस्ताक्षर तपासताना हस्ताक्षरतज्ञ ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पध्दतींचा वापर करतात. मी सांगतो की ऑनलाईन पध्दतीचा वापर करत नाही. हे म्हणणे खरे आहे की या केसमध्ये मी हस्ताक्षर तपासणी करताना सॉफटवेअरचा वापर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की वादग्रस्त हस्ताक्षर आणि सहया तपासण्याआधी मी त्याच्या नोटस काढतो. ते नोटस केस फाईलला असतात.

प्रश्न– तुम्ही केलेल्या नोटस अहवालासोबत पाठवल्या आहेत का?

उत्तर– नाही. जर न्यायालयास हव्या असतील तर मी दाखल करु शकतो.

हे म्हणणे खरे आहे की त्या नोटसच्या आधारे आम्ही अहवाल तयार करत असतो व पोलीसांनी आम्ही त्या नोटस देत नसतो. हे म्हणणे खरे आहे की सदर नोटसमध्ये वापरलेल्या सायंटीफीक पध्दतीचा उल्लेख केलेला असतो. हे म्हणणे खरे आहे की मी हस्ताक्षरतज्ञाचा एक वर्षाचा कोर्स पुर्ण केल्यानंतर एक दोन वर्षांनी माझ्याकडे सदर प्रकरण तपासणीकरीता आले. हे म्हणणे खरे आहे की आमचे वरिष्ठ हस्ताक्षरतज्ञ म्हणुन तपासणी करीत असतात. हे म्हणणे खरे आहे की comparison method हीएकमेव method वापरली जाते.

प्रश्न– हस्ताक्षर तपासणी करताना ६ method वापरल्या जातात?

उत्तर– आम्ही एकच method वापरतो.

हे मला सांगता येणार नाही की comparison method ही Analysis comparison evaluation (A.C.E.) अंतर्गत method असते.

प्रश्न– Analysis comparison evaluation मध्ये अक्षराचे characteristics, letter format, silent and pressure या गोष्टी विचारात घेतल्या जातात?

उत्तर– आम्ही general habits, individual habits विचारात घेतो. तुम्ही जी पध्दत सांगितली आहे त्याबद्दल माहीत नाही.

सदर केसमध्ये हस्ताक्षर तपासताना मी microscope and digital image चा वापर केला होता.

प्रश्न– Comparison method हि केवळ scientific document alteration साठी वापरतात?

उत्तर– मी या केसमध्ये comparison method वापरली आहे.

०४-१२-२५

मी सहयांचे ३६ नमुने घेतले होते.

प्रश्न– सदर अहवाल तयार केल्यानंतर तो सेकंड एक्झामायनरकडुन व्हेरीफाय करुन घ्यायचा असतो. तुम्ही सदरचा अहवाल त्यांच्याकडुन व्हेरीफाय करुन घेतला होता का?

उत्तर– मी सिनीयर एक्झामायनरकडुन तपासणी तसेच व्हेरीफाय करुन घेतले होते.

प्रश्न– तपासणी करताना कोणत्याही सिनीयर अधिका–याचे तुम्ही conclusion घेतले नाही?

उत्तर– Conclusion माझेच असते. सिनीयर अधिकारी पॅनेलमध्ये असतात व त्यांच्याकडुन केवळ व्हेरीफाय आम्ही करतो.

हे म्हणणे खरे नाही की सदर प्रकरणातील वादग्रस्त सहयांबाबत मी नोटस बनवल्या नसल्याने त्या अहवालासोबत दाखल नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मी सदर प्रकरणात कोणत्याही scientific पध्दतीचा वापर न करता बोगस स्वरुपाचा रिपोर्ट दाखल केला आहे. आता मला नि.२०५ वरील आमच्या कार्यालयाकडे अहवाल मागवण्यासंदर्भात पोलिसांनी दिलेले पत्र मला दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की त्या पत्राद्वारे माझी तपासणीसंदर्भात नेमणुक झाली होती.

प्रश्न– वादग्रस्त Q4 वरील सही सारखी सही ही नमुना S102 वर मुद्दाम केलेली आहे ?

उत्तर– Q4 वरील सही मी S102 वरील सहीसोबत चेक केलेली नाही. Q3 वरील सही मी S102 वरील सही सोबत चेक केली होती.

हे म्हणणे खरे नाही की एखाद्या व्यक्तीने एखाद्या दिवशी जास्त सहया केल्या तर त्या सहयांमध्ये बदल जाणवतो. मी सांगतो की बदल जाणवत नाही, व्हेरीएशन असु शकते.

08-12-25

प्रश्न– व्हेरीएशन असण्याचे काय कारण आहे?

उत्तर– ते नॅचरल व्हेरीएशन असते.

सहीमधील व्हेरीएशनमध्ये व्यक्तीच्या मानसिक व शारिरीक स्थितीचा संबंध असु शकतो. हे म्हणणे खरे आहे की वादग्रस्त सहया व नमुना सहया या एकत्रीत तपासणे गरजेचे आहे. हे म्हणणे खरे आहे की सहयांची तपासणी करताना त्यामधील strokes विचारात घेणे गरजेचे आहे. मला पेन ऑपरेशनबाबत माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की पेन ऑपरेशनमध्ये शब्दांची समान रचना, अक्षराच्या शरीराच्या आकारची तपासणी

आणि अक्षराच्या नमुन्याची वैशिष्ठये संदर्भात तपासणी असते.

प्रश्न– हस्ताक्षर अहवालात लेखन प्रकाराबाबत तुम्ही उल्लेख केलेला नाही?

उत्तर– आम्ही लेखन प्रकाराबाबत नमुद करत नाही.

लेखन संचाबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की हस्ताक्षर तपासणी करताना मला लेखन संचाची माहीती नसल्याने मी खोटया स्वरुपाचा अहवाल दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की अहवालात मी सायंटीफीक पध्दतीचा वापर केल्याबाबत नमुद केलेले नाही. मी सांगतो की comparison method बाबत नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रश्नार्थक कागदपत्रांवरील सहया व मुळ कागदपत्रांवरील सहया हे तपासायचे असते. मी सांगतो की side by side method वापरली आहे. हे म्हणणे खरे नाही की वादग्रस्त हस्तलेखन, नमुना हस्तलेखन व नैसर्गिक हस्तलेखनची मी सोबत तपासणी केलेली नाही.

प्रश्न– रिपोर्टमध्ये तुम्ही hand magnifier, ultralens आणि microscope वापरण्याबाबत नमुद केले नाही?

उत्तर– रिपोर्टमध्ये ते नमुद करण्याची गरज नाही. मी ते वापरले होते.

हे म्हणणे खरे नाही की सदर प्रकरणात मी वैज्ञानिक उपकरणांचा वापर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर प्रकरणात मला कोणत्याही प्रकारचा अनुभव नसताना मी केवळ मोघम स्वरुपाचा रिपोर्ट तयार करुन दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की मीखोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

| रिमोट पॉइंट कॉर्डीनेटर | साक्षीदार | संबंधीत न्यायदंडाधीकारी यांची सही |
|---|---|---|
| (सही) | (सही) 08-12-25 | Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.12.08 17:37:15 +0530 |
| एस.एस.गायकवाड | प्रकाश पोपट पवार | (डॉ.एन.एस.सबनीस) |
| कनिष्ठ लिपीक संगणक विभाग, पुणे | सहा.शासकीय दस्ताऐवज परिक्षक, सीआयडी, पुणे | न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२, पारनेर. |
| | | दि. ०८/१२/२०२५ |

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.12.08 17:37:29 +0530

दिनांकः ०८/१२/२०२५.

(डॉ.एन.एस.सबनीस)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२, पारनेर.

**CRIME INVESTIGATION DEPARTMENT**
MAHARASHTRA STATE.



**Name : PAWAR PRAKASH POPAT**

**Rank : Asst. S.E.D.**

**Sr. No.: 3360/2025**

Dy. Inspector General of Police
(Admin), C.I.D., M.S., Pune

Head Office : Addl.Director General of Police
CID, M.S.Pune.
University Chowk, Chavan Nagar,
Pashan Road, Pune - 411008

Office Phone :

Date of Birth : 01/06/1986

Blood Group : O+ve

Identification Mark : Mole on left thigh

Date of Issue : 01/08/2025

- If found, Please return this card to the nearest Police station.
- Upon transfer / retirement, do not fail to return this card to the issuing Authority.

Signature of I-Card Holder